


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १३५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२८ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सातार्‍यातील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर बहिष्कार

## संमेलनापूर्वीच उफाळला मोठा वाद!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, सातारा :** सातार्‍यात १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान होणार्‍या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर विद्रोही सांस्कृतिक चळवळीने बहिष्कार टाकला आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राष्ट्रीय समन्वय समितीचे सदस्य डॉ. भारत पाटणकर यांनी मांडलेला ठराव एकमताने मंजूर झाला आहे. त्यामुळे ९९ वे संमेलन चांगलेच गाजण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, अ. भा. मराठी साहित्य संमेलनानंतर विद्रोही संमेलनही सातार्‍यातच होणार असल्याने वादाला चांगलीच फोडणी मिळणार आहे.



सातार्‍यातील संमेलन हे 'घालमोड्या दादांचे संमेलन' असल्याची टीकाही 'विद्रोही'ने केली आहे. तसेच छत्रपती संभाजीराजेंबद्दल बदनामीकारक लिखाण करणारा गद्दार माणूस संमेलनाचा अध्यक्ष आहे. त्या संमेलनाच्या मंडपात अलुतेदार-बलुतेदारांनी जाऊ नये. अन्यथा आपली गद्दारी सिद्ध होईल, असे आवाहन डॉ. भारत पाटणकर यांनी केले. यावेळी 'उपरा'कार पद्मश्री लक्ष्मण माने, कॉ. धनाजी गुरव, डॉ. सुहास महाराज फडतरे, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू ॲड. सुभाष पाटील, ॲड. वर्षा देशपांडे, कॉ. विजय मांडके उपस्थित होते.

सातार्‍यात होणार्‍या 'घालमोडे दादां'च्या साहित्य संमेलनावर महाराष्ट्रातील जनतेने बहिष्कार घालावा, असे आवाहन डॉ. भारत पाटणकर यांनी केले आहे. पाटणकर पुढे म्हणाले की, मराठी ग्रंथकार सभेने (ज्याला आजचे साहित्य संमेलन म्हणतात) १८८५ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्यामार्फत महात्मा फुलेंना निमंत्रण पाठवले होते. परंतु, 'उंटावरून शेळ्या हाकणार्‍या घालमोड्या दादांच्या साहित्य संमेलनाला मी येणार नाही' असे सांगून महात्मा फुलेंनी ते निमंत्रण धुडकावून लावले होते. कारण त्यांना त्यावेळच्या साहित्य संमेलनांमधील जातीय विषमतेवर आणि ब्राह्मणी वर्चस्वावर त्यांना आक्षेप होता. या पार्श्वभूमीवर आजची परिस्थिती पाहिली तर त्या काळापेक्षाही वाईट असल्याची टीका डॉ. पाटणकरांनी केली.

बुद्ध, अश्वघोष, धर्म, किर्ती या बौद्ध दार्शनिक मार्गदर्शकांपासून पुढे कबीर, रविदास, नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, गोरा कुंभार, सावता माळी, जनाबाई, सोयराबाई,चोखा मेळा, मुक्ताबाई, अशी संतपरंपरा या देशाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज ते भारतवर्षाचे शेवटचे सम्राट शंभू पुत्र शाहू महाराज ते थोरले प्रतापसिंह महाराज, अशीही परंपरा आहे. या उलट घालमोड्या दादांची आजची परंपरा या इतिहासाला अंधारात घालणारी आहे.

मनुस्मृतीसारखी, बहुजन जाती-जमाती आणि स्त्रियांच्या शोषणावर आधारित व्यवस्था पुन्हा या देशात राबवणारी आणि इतिहासाला विकृत करून खरा इतिहास गायब करणारी आहे. त्यामुळेच घालमोड्या दादांच्या साहित्य संमेलनावर बहिष्कार घातला पाहिजे, असे डॉ. भारत पाटणकर म्हणाले.

## आडकुजी पाटील नन्नावरे यांची १०१ वी जयंती संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा माना समाज शिक्षण सहाय्यक मंडळ चंद्रपूर या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय आडकुजी पाटील नन्नावरे यांची १०१ वी जयंती श्रावण नन्नावरे संस्थेचे उपाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सरस्वती विद्यालय मुधोली तालुका भद्रावती येथे संपन्न झाली. स्व. अडकुजी पाटील नन्नावरे हे १५ वर्षे सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद बांधकाम सभापती, दुर्गापुर थर्मल पावर स्टेशन विस्थापितांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक पदावर काम केले. आदिवासी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून १९६४ मध्ये स्वतःच्या घरी वस्तीगृहाची स्थापना केली तसेच आदिवासी ग्रामीण भागातील मुधोली सारख्या दुर्गम भागात विद्यार्थ्यांना शिक्षणाची अडचण जाणवू नये म्हणून त्यांनी १९८७ ला सरस्वती विद्यालय मुधोली या शाळेची स्थापना केली.

१९८७ मध्ये लावलेले छोटसं वृक्ष आज त्याचं वटवृक्षांमध्ये रूपांतर झालं. सरस्वती विद्यालय मुधोली ता. भद्रावती आणि सरस्वती विद्यालय, सालोरी ता. वरोरा या दोन शाळा त्यांनी स्थापन केल्या.

प्रास्ताविकामधून मुख्याध्यापक विलास खोंड यांनी या ग्रामीण भागामध्ये एक जुनियर कॉलेज असावं व त्याकरीता संचालक मंडळ यांनी प्रयत्न करावे, असे मत व्यक्त केले. तसेच ज्या शिक्षण महर्षीने या ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची गंगा पोहोचवली त्यांचा एक पुतळा शालेय परिसरात उभा करावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. संस्थेचे सचिव श्रीरामे सर यांनी ही संस्था उभी करण्याकरीता पाटील साहेबांनी यांनी जीवाचे रान केले सर्वांना सोबत घेऊन ही संस्था स्थापन केली. संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. राजनहिरे सर यांनी या संस्थेकरीता जे आम्हाला चांगले करता येईल ते नक्कीच करू, असे मत त्यांनी व्यक्त केले. सामाजिक कार्यकर्ते दयानंद जांभुळे यांनी पुढील सत्रामध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांना ये-जा करण्याकरीता एका स्कूल बसची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. गुणवंतराव दडमल आणि अनंतराव मगरे सर यांनी सुद्धा या संस्थेच्या दृष्टिकोनातून सर्वांनी एकत्र येऊन संस्था कशी मोठी होईल व शाळेची प्रगती कशी होईल असा सकारात्मक विचार मांडले.


कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रावण नन्नावरे यांनी या शाळेच्या प्रगती करीता संचालक मंडळ सदोदित मदत करेल, असे मत व्यक्त केले. समाजाचे ज्येष्ठ नेते आणि स्वत: समाजाकरीता वाहून घेणारे स्व. आडकुजी पाटील नन्नावरे यांना विनम्र श्रद्धांजली वाहण्याकरिता त्यांचे आप्तस्वकीय मुलगा रवी पाटील, जावई दिगांबरजी वाघ आणि मुली मालाताई वाघ व उषाताई मगरे तसेच संस्थेचे सचिव श्रीरामे सर, संस्थेचे कोषाध्यक्ष राजनहीरे सर, गुणवंत दडमल संचालक, माधव जांभुळे संचालक, केशवराव जांभुळे माजी सरपंच, दयाराम जांभुळे सामाजिक कार्यकर्ता, कलाम शेख शिक्षक पालक समिती उपाध्यक्ष, मारोती बावणे शिक्षक पालक समिती सहसचिव, डॉ. सुधाकर हनंवते, अनंतराव मगरे, सुकेशिनी घोडमारे शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा, प्रमोद वाघ, अजबराव नन्नावरे, शाळेचे मुख्याध्यापक विलास खोंड, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर वृंद, सर्व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. रामटेके मॅडम यांनी केले तर आभार नंदू जांभळे यांनी केले. राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अवघ्या ६ ते ८ महिन्यांच्या अनुष्काची बॉडी छिन्नविछिन्न अवस्थेत घराबाहेर सापडली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, नागपूर :** नागपूर शहरातील हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नरसाळा गावाच्या मागील भागात मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. स्मशानभूमीजवळील नाल्याच्या मागे असलेल्या मजुरांच्या झोपडपट्टीत अज्ञात प्राण्याच्या हल्ल्यात अवघ्या ६ ते ८ महिन्यांच्या चिमकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून मजूर कुटुंबांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. मृत चिमुकलीचे नाव अनुष्का रवी मेळा असे असून ती मूळची मध्यप्रदेशातील सेलमिया गावची रहिवासी होती. कामासाठी ठेकेदाराच्या माध्यमातून अनुष्काचे कुटुंब नागपुरात आले होते. नरसाळा गावाच्या मागील बाजूस, स्मशानभूमीजवळ नाल्याच्या पलीकडे असलेल्या झोपडपट्टीत हे कुटुंब वास्तव्यास होते. या परिसरात बाहेरगावाहून आलेले अनेक मजूर आपल्या कुटुंबासह राहतात.

प्राथमिक माहितीनुसार, ही धक्कादायक घटना मध्यरात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास घडली असावी. अनुष्का आपल्या आईच्या कुशीत झोपलेली असताना अज्ञात प्राण्याने तिला उचलून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. काही वेळानंतर मुलगी दिसून न आल्याने कुटुंबीयांची झोप उडाली. त्यांनी तातडीने आजूबाजूच्या परिसरात शोधाशोध सुरू केली. काही अंतरावर झोपडपट्टीजवळच छिन्नविछिन्न अवस्थेत अनुष्काचा मृतदेह आढळून आला. हल्लेखोर प्राण्याने चिमुकलीच्या शरीराचे अक्षरशः लचके तोडल्याचे निदर्शनास आले आहे. तिच्या शरीराचा सुमारे ३० ते ४० टक्के भाग, विशेषतः छाती आणि हात प्राण्याने खाल्ल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर अंधार असून रात्रीच्या वेळी रस्त्यांवर पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने अंधाराचा फायदा घेत ही घटना घडली असावी, असा प्राथमिक





अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र, हा हल्ला नेमका कोणत्या प्राण्याने केला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. परिसरात कुत्रे, डुकरे किंवा अन्य वन्यप्राणी असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. या घटनेनंतर झोपडपट्टीतील मजूर कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून अनेकजण रात्री जागून पहारा देत आहेत.

दरम्यान, हुडकेश्वर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. वनविभागालाही या घटनेची माहिती देण्यात आली असून संभाव्य धोकादायक प्राण्याचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बाहेरगावाहून कामासाठी आलेल्या मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनाने तातडीने प्रकाशव्यवस्था, सुरक्षा आणि योग्य उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

## भाऊसाहेब पंजाबराव देशमुख जयंती शोभायात्रेने दुमदुमले बुलढाणा शहर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, बुलडाणा :** स्थानिक श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय तथा एच एस व्ही सी विभाग बुलढाणा येथून शिक्षण महर्षी डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती महोत्सव निमित्त विद्यार्थ्यांची शोभायात्रा बुलढाणा शहरातून दिनांक २६ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता प्राचार्य प्रमोद कावरे यांचे नेतृत्वात काढण्यात आली.



यावेळी अवघे बुलढाणा शहर दुमदुमून गेले होते शोभा यात्रेच्या सुरुवातीला शालेय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या अर्धाकृती पुतळ्याला प्राचार्य प्रमोद कावरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

नंतर डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पालखीचे पूजन करून शोभायात्रेस शुभारंभ केला शिक्षकांनी विद्यार्थ्या मार्फत अंधश्रद्धा निर्मूलन, वन्यजीव संरक्षण, महिला सबलीकरण, शिवजयंती उत्सव, स्वच्छता अभियान, मोबाईल चे दुष्परिणाम असे वेगवेगळे देखावे व फलक सादर केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी सादर केलेले बाल शिवाजी व मा जिजाऊ यांच्या अश्वारूढ वेशभूषणे लक्ष वेधून घेतले. याचबरोबर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध संस्कृतीचे दर्शन करणाऱ्या वेशभूषा, तसेच विशेष आकर्षण ठरणारी वारकरी वेशभूषा, यांनी बुलढाणाकरांचे लक्ष वेधून घेतले याचबरोबर एच एस व्ही सी चे पंढरीनाथ वाघ यांचे नेतृत्वात भजनी मंडळींनी सादर केलेले भजन हे विशेष आकर्षण होते.

शोभा यात्रेला श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती चे अजीवन सभासद एडवोकेट प्रतापराव भोंडे व त्यांचे कुटुंबीय तसेच सत्यजित राऊत अजीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व श्रीमती प्रतिभाताई राऊत शाळा समिती विशेष निमंत्रित सदस्य यांनी भेटी देऊन डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या पालखीचे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शहरातील नामांकित बुलढाणा अर्बन पतसंस्था व महावीर ड्रेसेस चे संचालक दिलीप कोठारी इत्यादींनी विद्यार्थ्यांसाठी बिस्किट खाऊ व पाणी वाटप करून शोभायात्रेचे स्वागत केले. शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक गजेंद्र राजपूत, विज्ञान विभाग प्रमुख योगेश भोंडे, एच एस व्ही सी विभाग प्रमुख पंढरीनाथ वाघ, विभाग शारीरिक शिक्षक संदीप पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

### पाण्यासाठी किती वणवण?

मराठवाड्याची राजधानी, पर्यटन नगरी, उद्योगनगरी अशी कितीतरी बिरुदे घेऊन मिरवणाऱ्या छत्रपती संभाजीनगर शहराचा पाणीप्रश्न तीन दशकांनंतरही सुटलेला नाही, उलट तो अधिकच गंभीर होऊ लागला आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी खरोखरच प्रयत्न होत आहेत काय? अशी शंका आता नागरिकांना येऊ लागली आहे.

शहराची पहिली पाणीपुरवठा योजना १९७५ ची तर दुसरी योजना १९९१ ची आहे. दोन वर्षांपूर्वी पहिल्या पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करून नवीन ९०० मिलिमीटर व्यासाची पाणीपुरवठा योजना अस्तित्वात आली आणि आता चौथ्या पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात येत आहे. ही योजना २५०० मिलिमीटर व्यासाची असून त्यावर २७४० कोटी रुपये खर्च केला जात आहे.

योजनेचे काम पूर्ण झाल्यावर शहराला दररोज ४०० दशलक्ष लिटर पाणी मिळणार आहे. परंतु, या योजनेचे काम 'वाढता वाढता वाढे ' असे होऊ लागले आहे. त्यामुळे अंशत: काम पूर्ण करून शहराला पहिल्या टप्प्यात २०० दशलक्ष लिटर पाणी दररोज देण्याची घोषणा करण्यात आली. हे पाणी नक्की मिळाले पाहिजे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जीव्हीपीआर कंपनीला डिसेंबरअखेरची 'डेडलाइन' दिली. आजवरच्या अनेक आश्वासनांप्रमाणे तीसुद्धा हुकणार आहे. मुख्यमंत्र्यांचे आदेश 'तुडुंब' भरलेल्या नाथसागरात वाहून गेले काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम लांबणीवर पडत असताना जुनी यंत्रणाही धोका देऊ लागली आहे. या योजना कालबाह्य झाल्या असल्या, तरी नवीन योजना सुरू होईपर्यंत त्या जपणे गरजेचे आहे. १५ दिवसांपासून या योजनांनी पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडून टाकले आहे. पाच दिवसांआड होणारा पाणीपुरवठा आता आठव्या – दहाव्या दिवसावर गेला आहे. पंपगृहात बिघाड, ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड आदी कारणे सांगून प्रशासन मोकळे होते. योजनेवरील निम्मे पंप बंद आहेत. परिणामी लाखो नागरिकांची हिवाळ्यात हंडाभर पाण्यासाठी वणवण सुरू आहे. त्याचे सत्ताधारी व विरोधकांनाही घेणे देणे नाही. त्यांना महापालिका जिंकायची आहे, मग पाणी प्रश्न कधीही सुटो.

पाण्याचा प्रश्न गांभीर्याने सोडवणे गरजेचे आहे. नवीन योजनेच्या कामातील अडथळे पूर्णपणे दूर झाले आहेत. आर्थिक विषयाचा अडसरही दूर झाला आहे. या कामावर मुख्यमंत्री कार्यालय, उच्च न्यायालयाचे लक्ष आहे. दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्तांकडून कामाचा आढावा घेतला जातो. सचिव स्तरावर नियमित पाठपुरावा केला जातो. मुख्य अभियंत्यांद्वारे सूक्ष्म नियोजन केले जाते. तरी तरीही योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामाला विलंब का लागत आहे ? मुख्यमंत्र्यांनी दिलेली डेडलाईन का पाळली जात नाही , हे मुद्दे विचार करण्यास भाग पाडतात. आता महापालिका निवडणुकीची आचारसंहिता शिथिल होईपर्यंत पाणी योजनेसंदर्भात कोणताही नवा निर्णय किंवा घोषणा करता येणार नाही. योजनेचे काम करणाऱ्या यंत्रणा याचा लाभ घेत आहेत काय, अशी शंका आली नाही, तरच नवल. जुन्या योजनेत होणारा बिघाड आणि त्यामुळे आठव्या–दहाव्या दिवशी होणारा पाणीपुरवठा नागरिकांच्या सहनशक्तीची परीक्षा घेणारा ठरू लागला आहे.

महापालिका निवडणुकीसाठी युती – आघाडीचे समीकरण जुळवण्यात नेतेमंडळी गुंतली आहेत. परंतु, पाण्यासारख्या अत्यावश्यक सेवेला आचारसंहितेच्या बंधनात अडकवून ठेवण्याबाबत ते काहीच बोलणार नसतील तर ते कसे सहन करायचे ? जुन्या पाणीपुरवठा योजना सुस्थितीत ठेवण्यासाठी पालिकेच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद आहे. अत्यावश्यक सेवा असल्यामुळे निविदेशिवाय कामे करण्याची मुभा महापालिकेला आहे. असे असताना आठ – दहा दिवस नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी देखील पूर्ण आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. कामातील अडथळे दूर करण्यात आले आहेत, असे असताना या योजनेचे काम रेंगाळत आहे. ऐन निवडणुकीच्यावेळी या बाबी प्रकर्षाने उघड होत आहेत. ही धोक्याची घंटा कुणाचा 'खेळ' करणार हे लवकरच कळणार आहे.

# ....तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात.



दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतः सह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो.

छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

**जुने जाऊ द्या मरणालागुनी.....**
**जाळूनी किंवा पुरूनी टाका....**

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# प्रामाणिक लोकांनी प्रामाणिकपणा सोडून द्यायचा का?

कधी कधी असा प्रश्न पडतो की एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या भारतात किती लोक खरोखर प्रामाणिक आहेत?आपल्या भारतात एकेकाळी प्रामाणिक लोकांची संख्या फार जास्त होती. गावापासून ते शहरापर्यंत जिकडे तिकडे प्रामाणिक लोक दिसायचे. संतांची, समाजसुधारकांची, महामानवांची आणि विचारवंतांची शिकवण आत्मसात केलेले लोक केवळ कष्टाची भाकरी खायचे आणि आनंदाने जीवन जगायचे. या सर्व प्रामाणिक लोकांना भ्रष्टाचार, लाच घेणे देणे, लबाडी, खोटेपणा, असत्य, अफरातफर, फसवाफसवी ह्या गोष्टी मुळीच आवडत नसत. सगळ्या प्रामाणिक लोकांना जीवन जगताना प्रामाणिकपणाला चिकटून राहायला आवडत असे.त्या काळात एखाद दुसरी व्यक्ती अप्रामाणिक जीवन जगताना व वाईट कृत्ये करताना आढळायची. परंतु,अप्रामाणिक व वाईट लोकांना समाजात कवडीचीही किंमत नव्हती.समाजात सर्वत्र प्रामाणिक लोकांना मानसन्मान दिला जायचा.

आता ती परिस्थिती बदलली आहे. प्रामाणिक लोकांनी समाजात जे सभ्यतेचे चांगले वातावरण निर्माण केले होते ते आदर्श वातावरण आता कुठेच दिसत नाही.सध्या प्रामाणिक लोकांची संख्या घटली आहे.आणि अप्रामाणिक लोकांची संख्या मात्र फार फोफावली आहे. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे.अप्रामाणिक लोक अगदी सहजतेने भ्रष्टाचार करत आहेत. लबाडी, खोटेपणा, फसवणूक व अफरातफर करणे भ्रष्टाचारी लोकांच्या डाव्या हाताचा मळ झाला आहे.सर्वच क्षेत्रांत कार्यरत असलेल्या अप्रामाणिक लोकांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.सध्य स्थितीला किती राजकारणी लोक नेक व प्रामाणिक आहेत?थोडाही भ्रष्टाचार न करणारे चांगले राजकारणी किती उरले आहेत? आपल्या देशातील किती नोकरदार प्रामाणिकपणे आपली नोकरी करतात?वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून प्रथम नोकरीचे कर्तव्य इमानदारीने पार पाडतात?

मुळात प्रामाणिकपणा हा एक संस्कार आहे.आजी आजोबा आणि आईवडील प्रामाणिक व कष्टाळू असतील तर त्या घरातील भावी पिढी सुध्दा प्रामाणिक व कष्टाळू निपजते.आजकाल बहुतांश घरातून प्रामाणिकपणाचा, कष्ट करण्याचा व चारित्र्याला जपण्याचा संस्कार लुप्त झाला आहे.म्हणून समाजात,गावात व देशात अप्रामाणिक, आळशी व जीवन ध्येय नसलेल्या व्यक्तींची संख्या वाढत आहे. देश, राज्य व गावाचा विचार न करता फक्त आपण ज्या समाजातून येतो त्या समाजाचा विचार केल्यास, आपण ज्या क्षेत्रात नोकरी करतो त्या क्षेत्रातील लोकांचे निरीक्षण केल्यावर असे लक्षात येते की बहुतांश लोक प्रामाणिक नाहीत. कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे आणि मनमानी जीवन जगण्यासाठी, झटपट श्रीमंत होण्यासाठी खटपट चालू आहे, गैरमार्गांचा अवलंब केला जात आहे. आपण स्वतः व आपले नातेवाईक, मित्र परिवार, समाजबांधव, गावकरी, सहकारी आणि देशबांधव यापैकी किती लोक चांगल्या नियतीचे आहेत? ते लोक प्रामाणिकपणे कष्ट करतात, कष्टाच्या पैशावर जीवन जगतात, हरामाचा पैसा कमवत नाहीत. किती डॉक्टर रुग्णांवर कमी पैशात चांगला व खात्रीचा उपचार करतात?किती वकील आपल्या गरजेपुरती फिस घेऊन वकीलीचा व्यवसाय करतात?

असे किती व्यापारी व दुकानदार आहेत जे अन्नधान्यात अजिबात भेसळ करत नाहीत,जीएसटी वेळेवर भरतात?दूधात पाण्याची मात्रा न वाढवता दूध विकणारे किती आहेत?शुद्ध तुपात डालडा न मिसळणारे किती आहेत?असे किती कंत्राटदार आहेत जे मंजूर बजेटचा विकास कामांमध्ये पुरेपूर उपयोग करतात?शासनाची विकासकामे करताना टक्केवारी न मागणारे अधिकारी व पदाधिकारी किती आहेत? रसायनांचा वापर न करता भाजीपाला विकणारे व फळे विकणारे किती लोक आहेत?सण उत्सवासाठी व महामानवांच्या जयंतीसाठी गोळा केलेल्या वर्गणीत भ्रष्टाचार न करणारे किती संयोजक आहेत?य ा प्रश्नांची उत्तरे नकारार्थी मिळतात.यावरुन लोकांचा अप्रमाणिकपणा व भ्रष्टाचार करण्याची मानसिकता लक्षात येते.

**अप्रामाणिकपणाच्या धांगडधिंग्यात**

आणि फसवाफसवीच्या युगात आजही भारतातील प्रत्येक क्षेत्रात काही प्रामाणिक व अतिशय मेहनती व कष्टाळू लोक आहेत. त्यांचे वागणे बोलणे नेहमी समाजहिताचे असते.लोकांचे कल्याण साधणारी व समाजहिताची कामे करताना त्यांना आनंद प्राप्त होतो. समाजासाठी आपल्या मिळकतीचा एक हिस्सा उपयोगात आणणारे लोकसुद्धा या दुनियेत आढळतात. आपल्या हातून भ्रष्टाचार व अफरातफर होणार नाही याची काळजी घेतात.फक्त कष्टाची भाकरी खाणे त्यांना आवडते. हरामाची व पापाची कमाई करण्यासाठी त्यांचे हात पुढे सरसावत नाहीत.कितीही वाईट वेळ आली तरीही प्रामाणिक माणसे आपला सभ्यपणा थोडाही ढळू देत नाहीत.असे असले तरीही वाईट प्रवृत्तींचे लोक सभ्य आणि प्रामाणिक माणसांना विनाकारण त्रास देत असतात.समाजात व गावात दांडगट व अप्रामाणिक लोकांचा बोलबाला सुरू आहे. जिकडे तिकडे वाईटांचा अमंल व अप्रामाणिकांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.हे पाहून प्रामाणिक माणसांचे मन दुःखी कष्टी होत आहे.आणि मग त्यांच्या मनाला प्रश्न पडतो,प्रामाणिक लोकांनी प्रामाणिकपणा कायमचा सोडून द्यावा काय?हा प्रश्न आजच्या भ्रष्ट व्यवस्थेला पुन्हा पुन्हा विचारण्याची वेळ आली आहे.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९७३०९३९७३२.**

# अंगावर काटा आणणारा 'बॅटल ऑफ गलवान'चा टीजर रीलिज;

## सलमान खानचे चाहत्यांना बर्थडे सरप्राइज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानच्या वाढदिवशी त्याच्या आगामी 'बॅटल ऑफ गलवान' या सिनेमाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.सलमान खानच्या ६० व्या वाढदिवशी त्याच्या चाहत्यांना खास सरप्राइज मिळाले आहे. अभिनेत्याच्या बहुप्रतिक्षित 'बॅटल ऑफ गलवान' या सिनेमाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला.ज्यात प्रेक्षकांच्या लाडक्या 'भाईजान'चा वेगळा लूक पाहायला मिळतो आहे.

या चित्रपटात सलमानने कर्नल बी. संतोष बाबू यांची भूमिका साकारली आहे. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या भारत–चीन संघर्षात ते शहीद झाले होते. ते १६ बिहार रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर होते असून त्यांना मरणोत्तर देशाचा दुसरा सर्वोच्च शौर्य पुरस्कार असणारे महावीर चक्र प्रदान करण्यात आलेले.

Battle Of Galwan हा चित्रपट अपूर्व लाखिया यांनी दिग्दर्शित केला असूनसलमानसहअभिनेत्री चित्रांगदा सिंह यामध्ये मुख्य भूमिकेत आहे. देशभक्तीची भावना या टीझरमध्ये पाहायला मिळाली. तसेच टीजरमध्ये 'मेरा भारत देश महान है' हे गाणेही ऐकू येते, जे अंगावर काटा आणणारे ठरते.'बॅटल ऑफ गलवान'चा




टीजरसलमान खानच्या तोंडीअसणाऱ्या संवादांमुळेही चर्चेत राहील असा आहे. टीजरची सुरुवातच सलमानच्या एका प्रोत्साहित करणाऱ्या संवादाने होते. कर्नल बी.संतोष बाबू यांच्या भूमिकेत असणारा सलमान इतर सैनिकांना म्हणतो, 'सैनिकांनो, लक्षात ठेवा, जर तुम्ही जखमी झालात तर ते पदक समजा आणि जर तुम्हाला मृत्यू दिसला तर सलाम करा आणि म्हणा... बिरसा मुंडा की जय, बजरंग बली की जय. भारत माता की जय!'टीजरमध्ये एकदृश्य दाखवले जाते ज्यामध्ये सलमानच्या हातात केवळ एक जाड लाकूड आहे आणि इतर सैनिकही साथीला आहेत.

समोरुन शत्रू सैन्याची मोठी तुकडी या मोजक्या भारतीय सैनिकांवर हल्ला करते. देशासाठी काहीही करण्याची जिद्द असणारे हे जवान शत्रूचा सामना करतात. त्यावेळी सलमानचा आणखी एक संवाद ऐकू येतो, 'मरणाला का घाबरायचं? ते कधीतरी येणारच आहे.

'सलमान दीर्घकाळानंतर एका वेगळ्या भूमिकेत दिसणार असून, त्याचे चाहते टीजर पाहूनच आनंदी झाले आहेत. त्याची ही भूमिका नेहमीच्या पात्रांपेक्षा वेगळी वाटते आहे आणि तो बॉक्स ऑफिसवर कमाल करेल हे, हे पाहण्यासाठी ही चाहते उत्सुक आहेत. सलमानचा हा चित्रपट १७ एप्रिल २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे संगीत हिमेश रेशमियाचे असून यामध्ये अनेक नवीन कलाकारांचाही समावेश आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# शाळा सुटली आणि हाती घेतले फावडे

## डहाणूच्या जिल्हा परिषदेचेच्या शिक्षकांचे खाणीवमध्ये श्रमदान

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, डहाणू (पालघर) :** शिक्षक हा समाजाचा आरसा असतो, हे पुन्हा एकदा कृतीतून सिद्ध झाले आहे. डहाणू तालुक्यातील कोल्हाण व चारोटी केंद्रातील शिक्षकांनी शाळा सुटल्यानंतर विश्रांती न घेता थेट खाणीव परिसरात फावडे हाती घेत श्रमदान करत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत, शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी शाळा सुटल्यानंतर या दोन्ही केंद्रातील शिक्षकांनी एकत्र येत उत्स्फूर्तपणे वनराई बंधाऱ्याचे बांधकाम केले. या उपक्रमात केवळ उपस्थिती नोंदविण्यावर न थांबता, पाण्याचे नियोजन व संवर्धनासाठी प्रत्यक्ष श्रमदान करण्यात आले.

१०० पेक्षा अधिक शिक्षकांचा सहभाग या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कोल्हाण व चारोटी केंद्रातील १०० पेक्षा अधिक महिला व पुरुष शिक्षकांचा प्रत्यक्ष सहभाग. शिक्षकांनी खाणीव परिसरात पाणी अडविण्यासाठी आवश्यक असलेले काम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण केले. या श्रमदान उपक्रमासाठी आवश्यक असलेले साहित्य ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करून देण्यात आले होते. मात्र, अधिकारी केवळ मार्गदर्शक म्हणून न राहता प्रत्यक्ष मैदानात उतरले. डहाणूचे गटशिक्षणाधिकारी संजय वाघ यांनी स्वतः हातात फावडे घेऊन श्रमदानात सहभाग घेत शिक्षकांचा उत्साह द्विगुणित केला. त्यांच्यासोबत कोल्हाण केंद्रप्रमुख नंदकुमार लिलका तसेच चारोटी केंद्रप्रमुख श्री. सुरेश म्हस्कर यांनी ही प्रत्यक्ष कामात हातभार लावला. पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न उन्हाळ्यात दिवसेंदिवस तीव्र होत जाणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी वनराई बंधारे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. शिक्षकांनी उचललेल्या या पुढाकारामुळे खाणीव परिसरातील पाणी पातळी वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. जिल्हाभरात होत आहे. कौतुक शिक्षकांच्या या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाचे संपूर्ण पालघर जिल्ह्यात कौतुक होत आहे. शाळेत ज्ञानदान आणि समाजात श्रमदान ही भूमिका घेत शिक्षकांनी समाजासाठी नवा आदर्श घालून दिला आहे.

# निफाड तालुक्यात बिबट्याची दहशत; पिंजरा लावण्याची नागरिकांची मागणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील शिवडी, उगांव परिसरात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून त्याचा वाढता वावर स्थानिकांसाठी धोकादायक ठरत आहे. या कालावधीत बिबट्याने दोन कुत्रे व दोन मेंढ्यांचा फडशा पाडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उगांव रेल्वे स्टेशन व शिवडी परिसरात बिबट्या तळ ठोकून असल्याचे दिसून येत आहे. परिसरातील विविध ठिकाणी त्याचे दर्शन होत असून, शिवडी भागातील दोन शेतकऱ्यांचे कुत्रे बिबट्याने ठार केल्याची घटना घडली आहे.दोन दिवसांपूर्वी महेश शिंदे यांच्या घरालगत शेतात असलेल्या मेंढपाळाच्या कळपातून रात्रीच्या वेळी बिबट्याने एक मेंढरू उचलून नेले. त्यानंतर शुक्रवार, दि.२६ रोजी मध्यरात्री पुन्हा दुसरे मेंढरू उचलून नेल्याची घटना घडली. बिबट्याच्या दहशतीमुळे नागरिक भयभीत झाले असून शाळा – महाविद्यालयात जाणारी मुले, शेतात कामासाठी जाणारे मजूर तसेच शेतात घर करून राहणारे शेतकरी व हंगामी कामगारांमध्ये भीती पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने तात्काळ उपाययोजना करत बिबट्याला जेरबंद करण्यासाठी शिवडी येथे पिंजरा लावावा, अशी मागणी शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे, सोसायटीचे चेअरमन रामनाथ शिंदे, माजी सरपंच प्रमोद क्षीरसागर, संजय शिंदे, अरुण क्षीरसागर, रोशन शिंदे, महेश शिंदे, विश्वनाथ शिंदे, रामनाथ सांगळे, राजेंद्र वाबळे, अब्दुल शेख, दत्तात्रेय सुडके, धर्मा क्षीरसागर, सचिन क्षीरसागर आदींसह ग्रामस्थांनी केली आहे.

# जवळा मुरार येथील मुलांनीच केला आईवडीलांचा खुन; घटनेचा उलगडा



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथे एकाच कुटुंबातील चार जणांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. त्या घटनेचा उलगडा पोलिसांना केला असून आई-वडिलांचा फोन करून दोन मुलांनी रेल्वे खाली उडी मारून आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. मुदखेड तालुक्यांतील जवळा मुरार गावात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी २५ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली होती यात रमेश लखे वय ५१ राधाबाई लगे वय ४४ हे घरांत मृत अवस्थेत आढळून आले होते, तर त्यांची दोन्ही मुलं उमेश लखे वय २५ आणि बजरंग लखे वय २२ यांचे मृतदेह गावापासून काही अंतरावर असलेल्या मुगट रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे पटरीवर आढळून आल. राधाबाई ह्या नेहमी सकाळी मंदिराला पूजेसाठी यायच्या पण त्यादिवशी मंदिरात न आल्याने गावातील एक महिला त्यांच्या घरी गेले आणि हा प्रकार उघडकीस आला दोन्ही मुलांनीच आपल्या आई वडिलांचा गळा दाबून खून केला. त्यानंतर स्वतः दोघांनी रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली. शवविच्छेदनाच्या अहवाला नंतर खुनाचा हा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बारड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आर्थिक विवंचनेत हा प्रकार घडल्याची चर्चा सुरू आहे.

# मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्यांवर होणार कठोर दंडात्मक कार्यवाही

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई होणार आहे. अशा प्रकारच्या कृत्यावर आळा घालण्याचे दृष्टीने दिनांक २८ डिसेंबर रोजी पासून ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी नाकेबंदी लावण्यात येणार आहेत. दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी वर्ष समाप्तीचे व नववर्षाचे स्वागत मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार असल्याने सदर उत्सव साजरा करण्याकरीता अतिउत्साही तरुण मंडळी मद्य प्राशन करुन दुचाकी, चारचाकी वाहने भरधाव वेगाने, बेदरकारपणे चालवितात.

तसेच रोडने रॅश ड्रॉयव्हिंग, स्टंटबाजी सारखे कृत्य करतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गंभीर अपघात घडून जिवीतहानी होत असते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृत्यावर आळा घालण्याचे दृष्टीने दि.२८ डिसेंबर रोजी पासून ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी नाकेबंदी लावण्यात येणार आहे. कोणीही मद्य प्राशन करुन वाहन चालवितांना आढळून आल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

# आ.मुनगंटीवार यांच्या हस्ते पोंभूर्णा येथील घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत रेती वाटपाचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पोंभूर्णा येथे ५ ब्रास मोफत रेती वाटप उपक्रमाचा शुभारंभ हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

शासनाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत प्रशासन आणि भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे हा उपक्रम सुरू केला. घरकुल लाभार्थ्यांना प्रत्यक्ष दिलासा देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे नमूद करत गरिबों के सम्मान में, भाजपा पोंभूर्णा मैदान में असे प्रतिपादन आ. मुनगंटीवार यांनी केले.

पोंभूर्णा येथे मोफत रेती वाटप उपक्रमाचा शुभारंभ प्रसंगी भाजपा महिला प्रदेश महामंत्री अल्का आत्राम, भाजपाचे तालुकाध्यक्ष हरीश ढवस, तहसीलदार मोहनीश शेलवटकर, सुलभा पिपरे, राहुल संतोषवार, विनोद देशमुख, ज्योती बुरांडे, अजित मंगळगिरीवार, अजय मस्के, रोशन ठेंगणे, बंडु बुरांडे, जितू चुदरी, रवी गेडाम, रवी मरपल्लीवार, जनार्दन सातपुते, राकेश गव्हारे, धनराज सातपुते आदिंची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार मुनगंटीवार म्हणाले की, घरकुल लाभार्थ्यांना मदत करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, ही प्रत्येक सच्च्या भाजप कार्यकर्त्याची सामाजिक बांधिलकी आहे. गरिबांच्या सेवेतूनच खरी लोकसेवा घडते. गरिबों के सम्मान में, भाजपा मैदान में या भावनेतून कार्यकर्त्यांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



आजपासून सुरू झालेला हा उपक्रम अनेक कुटुंबांच्या घरकुलाचे स्वप्न साकार करण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

२०२५ मध्ये सुरू झालेली ही उपयुक्त वाटचाल, २०२६ मध्ये गोरगरिबांच्या हक्कांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी भक्कम पायाभूत ठरेल, असे सांगत आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, पुढील काळातही प्रत्येक गरजू लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचण्यासाठी कार्यकर्ते आणि प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने, एकदिलाने काम सुरू ठेवावे. त्यामुळे शासन निर्णयाचा खरा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारुविक्रीसह १.०४ लाखाचा मुद्देमाल जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या वॉश आउट मोहिमेअंतर्गत राज्य उत्पादन शुल्क विभागाने गुरुवारी २६ डिसेंबर २०२५ रोजी जलनगर व महाकाली कॉलरी परिसरात अवैध दारूविक्रीविरोधात धडक कारवाई केली. या कारवाईत मोहा सडवा, मोहा दारू तसेच महाराष्ट्र व मध्यप्रदेश निर्मित विदेशी दारू असा एकूण १ लाख ४ हजार ९०६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली पेट्रोलिंग दरम्यान खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर जलनगर व महाकाली कॉलरीतील काही घरांवर धाडी टाकण्यात आल्या. कारवाई दरम्यान तीन इसमांनी पथकाची चाहूल लागताच दारूबंदी गुन्ह्यातील मुद्देमाल बेवारस सोडून घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी ३ महिलांसह इतर ३ अज्ञात इसमांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

जप्त मुद्देमालात मोहा रसायन १३५० लिटर, मोहा दारू १५६ लिटर तसेच महाराष्ट्र व मध्यप्रदेश निर्मित विदेशी दारू ३०.६९ लिटर यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे निवडणुकीच्या काळात अवैध दारूविक्री रोखण्यासाठी अशीच कडक कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे. सदर कारवाई निरीक्षक संजय मिठारी, अभिनंदन कांबळे, उपनिरीक्षक विशाल कोल्हे, दत्तात्रय वरठी, सोमेश्वर गव्हारे, प्रमोद राजोते, सागर धिडशे, अतुल भिवगडे, सहायक दुय्यम निरीक्षक राहुल अत्रे तसेच जवान किशोर पेदुजवार, जगन पुट्टलवार, संजय हरिणखेडे, सुजित चिकाटे, प्रशांत घोडमारे आणि महिला जवान सुकेशनी कारेकार, वैशाली सातपुते यांनी केले.

# दिवा प्रभाग २७ मध्ये शिवसेनेची मोर्चेबांधणी

## शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली विजयाचा विश्वास

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७,दिवा (ठाणे) :** येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दिव्यात राजकीय हालचालींना वेग आला असून, प्रभाग क्रमांक २७ मध्ये शिवसेना (शिंदे गट) आपली संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करताना दिसत आहे.

शिवसेनेचे उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली या प्रभागात शिवसेनेला मोठे यश



मिळेल, असा ठाम विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. निवडणुका जाहीर होताच शैलेश पाटील ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. त्यांनी प्रभागातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीने बैठक घेऊन निवडणुकीच्या नियोजनाचा आढावा घेतला.

या बैठकीत त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला विशिष्ट जबाबदारी नेमून दिली असून, प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून दिव्यात रस्ते उत्तम दर्जाचे झाले असून पाणी योजने बाबत काम झाले आहे. जी कामे अर्धवट आहेत ती लवकरच पूर्ण होतील आणि नागरी सुविधांची अनेक कामे पूर्ण झाली आहेत असे शैलेश पाटील यांनी सांगितले. प्रभाग २७ मध्ये शिवसेनेची संघटनात्मक पकड मजबूत असून, गेल्या काही काळापासून जनसंपर्कावर भर देण्यात आला आहे.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिने बंद !

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, मुंबई :** श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने मंदिर दिनांक ०९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूड्डी यांनी केले आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे ३ महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे लाखो भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे. मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास हा दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण करण्यासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतलेला असून भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डूड्डी यांनी केले आहे.

# नमुंमपा आयुक्तांकडून सर्व निवडणूक कार्यालयांची प्रत्यक्ष पाहणी व मौलिक सूचना

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या दि.१५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता आठही विभागांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये कार्यान्वित झाली असून आज महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी या सर्व कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देत निवडणूक विषयक सर्व बाबींची व सुविधांची पाहणी केली व मौल्यवान सूचना केल्या. तसेच त्याठिकाणी आणखी आवश्यक असणाऱ्या सुविधांची तत्पर पूर्तता करण्याचे निर्देश संबधित अधिकाऱ्यांना दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड उपस्थित होते.

बेलापूर विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापासून पाहणीला सुरुवात करीत संपूर्ण दिवसभर आयुक्तांनी दिघा विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत आठही कार्यालयांना अथक भेटी देत पाहणी केली.यामध्ये प्रत्येक विभागातील प्रभागनिहाय मतदान केंद्रांचा आढावा घेतांना त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात क्षेत्रीय अधिकारी उपलब्ध असल्याबाबत त्यांनी खातरजमा केली. त्याचप्रमाणे आवश्यक क्षेत्रीय अधिकारी तत्परतेने पुरवावेत असेही निर्देश मनुष्यबळ व्यवस्थापन करणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांना दिले. सर्व आठही विभागात आचारसंहिता उल्लंघनावर काटेकोर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ सर्विलन्स पथके कार्यान्वित झाली असून त्यामध्ये आवश्यकते नुसार वाढ करण्याची सूचना आयुक्तांनी केली. महानगरपालिका व्यतिरिक्त इतर प्राधिकरणांच्या कर्मचाऱ्यांना महापालिका निवडणूक कामकाजाची नेमणूक पत्रे बजावण्यात आलेली आहेत, मात्र त्यामधील जे कर्मचारी कर्तव्यावर हजर झालेले नाहीत अशा कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून २४ तासाच्या आत हजर होण्याच्या सूचना कराव्यात अन्यथा त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात येईल अशा स्पष्ट नोटीसा द्याव्यात असे निर्देश आयुक्तांनी दिले.

सर्वच ठिकाणी निश्चित केलेल्या स्ट्राँग रुमच्या जागा व मतमोजणीच्या जागा यांची पाहणी करुन व त्याचे आराखडे तपासून त्यामध्ये आवश्यक सुधारणा आयुक्तांनी सूचविल्या. मतदान व मतमोजणी लगेचच लागोपाठ दिवशी असल्याने मतदान व मतमोजणी प्रसंगी कर्मचारी नेमणूका वेगवेगळ्या असाव्यात असेही आयुक्तांनी सूचित केले.सर्व ठिकाणी असलेल्या सीसीटिव्ही व्यवस्थेची कार्यालयाचा सर्व भाग समाविश करुन घेईल अशाप्रकारे मांडणी करावी व कार्यालयांमध्ये वेळेची नोंद करण्यासाठी मोठे घड्याळ असावे अशा छोट्या पण महत्वाच्या गोष्टींच्याही सूचना आयुक्तांनी केल्या.

मतमोजणीच्या ठिकाणी मोठया स्क्रिन असाव्यात असेही सूचित करण्यात आले. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येणारी संख्या लक्षात घेता सर्व कार्यालयांमध्ये पुरेशा प्रमाणात बैठक व्यवस्था असणारे प्रतिक्षा कक्ष असावेत असेही त्यांनी सूचित केले.सर्व कार्यालयांमध्ये नोंदणी कक्ष, मदत कक्ष, अर्ज तपासणी कक्ष, ना हरकत प्रमाणपत्रे स्विकृती कक्ष असे विविध कक्ष कार्यान्वित असून त्याठिकाणी लावलेले कक्षांचे फलक ठळक आणि वेधक असावेत अशा सूचना



त्यांनी केल्या.बेलापूर विभागात प्रभाग क्र.२५,२६,२७,२८ अशा चार प्रभागात १५८ मतदान केंद्रे, नेरुळ विभागात प्रभाग क्र.२१,२२,२३,२४ अशा चार प्रभागात १८० मतदान केंद्रे, वाशी विभागात प्रभाग क्र.१६,१७,१८ अशा तीन प्रभागात १२५ मतदान केंद्रे, तुर्भे विभागात प्रभाग क्र. १४,१५,१९,२० अशा चार प्रभागात १५९ मतदान केंद्रे, कोपरखैरणे विभागात प्रभाग क्र. १०,११,१२,१३ अशा चार प्रभागात १६० मतदान केंद्रे, घणसोली विभागात प्रभाग क्र. ०६,०८,०९ अशा तीन प्रभागात ११० मतदान केंद्रे, ऐरोली विभागात प्रभाग क्र.०४,०५,०७ अशा तीन प्रभागात १२१ मतदान केंद्रे व दिघा विभागात प्रभाग क्र.०१,०२,०३ अशा तीन प्रभागात १३५ मतदान केंद्रे, अशाप्रकारे २८ प्रभागांमध्ये एकूण ११४८ मतदान केंद्रे असून त्याठिकाणी आवश्यक असलेल्या सुविधा व व्यवस्थेचा आयुक्तांनी बाबनिहाय आढावा घेतला. ही सर्व मतदान केंद्रे जीओ टॅगिंग करुन घ्यावीत व गाड्यांनाही जीपीएस सिस्टिम बसवावी असे आयुक्तांनी निर्देशित केले.

मतदान केंद्रांची ठिकाणे तीन ते चार दिवस आधी शालेय व संबंधित व्यवस्थापनांकडून निवडणूक कामकाजासाठी ताब्यात घेण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करावी असेही निर्देश त्यांनी दिले.

विभागांमध्ये महिला स्पेशल - पिंक बूथ, स्वच्छता व वसुंधरा बूथ अशी विशेष मतदान केंद्रे स्थापित करावीत असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.ज्या शाळांमध्ये मोठया संख्येने मतदान केंद्रे आहेत अशा ठिकाणी मतदारांची गैरसोय होणार नाही याची काळजी आत्तापासूनच घेऊन त्यानुसार नियोजन करावे असेही स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.

बेलापूर विभागापासून सकाळी सुरुवात करीत नेरुळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली ते दिघा अशा आठही विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयांना अथकपणे प्रत्यक्ष भेट देत, तेथील कामकाजाची पाहणी करीत व त्यांना मौलिक सूचना देत नमुंमपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक सुव्यवस्थितपणे व पारदर्शक रितीने पार पाडण्यासाठी प्रत्येक संबधित घटकाने कर्तव्य भावनेने काम करावे असे सूचित केले.

# लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग बीड जिल्ह्यातूनच करावा - खा.सोनवणे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२७, बीड :** लातूर-कल्याण (जनकल्याण द्रुतगती) प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाचा मूळ मार्ग हा बीड जिल्ह्यातूनच जावा, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्याना लेखी पत्र सादर केले आहे.



पत्रात खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे, प्रस्तावित लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग हा बीड जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून या महामार्गामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक, शेतीपूरक व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. तसेच या महामार्गाच्या माध्यमातून दळणवळण अधिक सुलभ होऊन व्यापार, उद्योग आणि रोजगारनिर्मितीसाठी मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. सध्या सदर महामार्गाचा मार्ग धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे निदर्शनास आणून देत, असे झाल्यास बीड जिल्ह्यावर अन्याय होईल आणि जनतेत तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे शासनाने मूळ प्रस्ताव आणि नियोजनानुसारच लातूर - अंबाजोगाई - केज - बीड - जामखेड - अहिल्यानगर या मार्गानेच हा राष्ट्रीय महामार्ग विकसित करावा, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली आहे.

बीड जिल्हा हा मागास भाग म्हणून ओळखला जात असून अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधेमुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा होईल, असेही खा.सोनवणे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

त्यामुळे शासनाने जनहिताचा विचार करून लातूर-कल्याण राष्ट्रीय महामार्गाचा मूळ मार्ग बीड जिल्ह्यातूनच अंतिम करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. लातूर - कल्याण राष्ट्रीय महामार्ग हा बीड जिल्ह्यातूनच प्रस्तावित आहे, असे असताना काही मंडळी यात खोडा आणू पहात आहेत. मुळ प्रस्तावित मार्ग बदलल्यास बीड जिल्ह्याच्या विकासाला ब्रेक लागेल. त्यामुळे सदरील मार्गात बदल नकोच, असेही म्हटले आहे.

# सोयगाव येथील जि.प.कें.शाळेत विद्यार्थ्यासाठी 'राजमाता जिजाऊ विद्यार्थी बचत बँकेचे उदघाटन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२७, सोयगाव :** दशसूत्री उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रेरणेने तसेच गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारिक ज्ञान मिळावे. या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, सोयगाव येथे 'राजमाता जिजाऊ विद्यार्थी बचत बँक' हा उपक्रम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सुरु करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन तिरूपती अर्बन पतसंस्थेचे व्यवस्थापक विकास देसाई यांच्या शुभहस्ते पार पडले.

यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भागवत गायकवाड, उपाध्यक्षा राधाबाई सोनवणे, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष रविंद्र काळे, सदस्य तथा नगरसेवक हर्षल (बंटी) काळे, शिक्षणप्रेमी व समाजसेवक राजेंद्र दुतोडे, प्रशालेचे अध्यक्ष सुनील ठोंबरे, तसेच दुर्गाबाई निकुंभ, रविंद्र साखळे, रामेश्वर शिरसाठ, वैशाली सोनवणे आदी मान्यवराच्या हस्ते करण्यात आले विशेष बाब म्हणजे या बँकेत खऱ्या बँकेप्रमाणेच संपूर्ण व्यवहार प्रक्रिया विद्यार्थी स्वतः करून प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. शाळेने या उपक्रमासाठी छापील बँक चेक, विड्रॉल स्लिप (रक्कम काढण्याचे अर्ज), नोंदवही व आवश्यक कागदपत्रे तयार करून आणली होती. प्रत्यक्ष बँकेत जसे चेक भरून पैसे काढले जातात, त्याच पद्धतीने रक्कम काढण्यासाठी विड्रॉलचा स्लिप व रक्कम भरण्यासाठी भरणा स्लिप विद्यार्थ्यांच्या बचत बँकेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे जणू शाळेच्या आवारातच एक स्वतंत्र बँक सुरू असल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना येत आहे. या व्यवहारात विद्यार्थी कॅशिअर, लिपिक व व्यवस्थापक यांनी पैसे मोजणे, नोंद करणे, चेक तपासणे, जमा-खर्चाची नोंद घेणे अशी सर्व कामे मोठ्या जबाबदारीने पार पाडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना बँकेतील प्रत्यक्ष व्यवहार कसे होतात, पैसे कसे हाताळले जातात आणि



आर्थिक शिस्त किती महत्त्वाची असते याची खरी जाणीव होत आहे.

या विद्यार्थी बचत बँकेत कॅशिअर म्हणून सृष्टी अण्णा वाघ, लिपिक म्हणून शुभ्रा दत्तात्रय सोहनी, व्यवस्थापक म्हणून प्राची नितीन सोनवणे तर सहाय्यक म्हणून लावण्या किशोर खैरे यांनी जबाबदारी सांभाळली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय, व्यवहारिक बुद्धिमत्ता, आत्मविश्वास, निर्णयक्षमता व नेतृत्वगुण विकसित होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या संपूर्ण उपक्रमामागे शाळेचे कृतिशील व दूरदृष्टी असलेले मुख्याध्यापक किरण कुमार पाटील यांची संकल्पना व मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकवण्यावर भर देणारा हा उपक्रम त्यांच्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. कार्यक्रमास पंकज रगडे, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सुरेखा चौधरी, प्रतिभा कोळी, गणेश बाविस्कर, बिलाल बागवान आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

## थोडक्यात

### वेदांत हॉस्पिटलमधील कामगारांचे बेमुदत आंदोलन सुरू



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, डहाणू (पालघर) :** डहाणू येथील वेदांत हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे व्यवस्थापनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ दिनांक २६ डिसेंबर रोजी C.I.T.U.(सिटू) कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली बेमुदत आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हॉस्पिटलमधील कामगारांच्या वेतनात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. वाढती महागाई, कौटुंबिक जबाबदाऱ्या तसेच कामाचा वाढता ताण लक्षात घेता वेतनवाढ करणे अत्यावश्यक असताना, हॉस्पिटल प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा गंभीर आरोप कामगारांनी केला आहे. वारंवार निवेदने व चर्चा करूनही कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने अखेर कामगारांनी एकत्र येत बेमुदत आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

या आंदोलनाला आमदार कॉ. विनोद निकोले यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी हॉस्पिटल व्यवस्थापनावर जोरदार टीका करत कामगारांच्या मागण्या न्याय्य व रास्त असल्याचे सांगून त्या तात्काळ मान्य करण्याची मागणी केली. कामगारांच्या हक्कांसाठी आपण नेहमीच संघर्षरत राहू, असे आश्वासन ही त्यांनी यावेळी दिले. आंदोलनाच्या वेळी उ.ख.ढ.ण. तालुका सेक्रेटरी कॉ.रडका कलांगडा, कॉ.सुरेश जाधव, कॉ.रामदास सुतार, कॉ. सचिन घुटे यांच्यासह वेदांत हॉस्पिटलमधील मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते. यावेळी सर्व कामगारांनी एकजुटीने आंदोलनात सहभाग नोंदवत कामगार एकता जिंदाबाद, पगारवाढ द्या अशा जोरदार घोषणा दिल्या. कामगारांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच, हॉस्पिटल व्यवस्थापनाने लवकरात लवकर सकारात्मक चर्चा करून तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा ही यावेळी देण्यात आला.

### राजीव गांधी महाविद्यालयात डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयात थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.टी.शिंदे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.एम.जी.लोणे (कोकण ज्ञानपीठ वाणिज्य व कला महाविद्यालय उरण, रायगड) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य या विषयांवर बोलताना प्रा.डॉ.एम.जी.लोणे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकत शिक्षणाच्या माध्यमांतून समाज परिवर्तनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे सविस्तर विवेचन केले. ग्रामीण व वंचित घटकांसाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक चळवळीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांचे संपूर्ण जीवन हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ.राजू कोंडेकर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन प्रा.डॉ.साहेबराव हनुमंते तर आभार प्रा.डॉ.संदीप कोरडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### के.रामलू शाळेत कथाकथन स्पर्धेत विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल वाटप

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.२७, नांदेड :** कुंडलवाडी येथील पूज्य साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त के.रामलू शाळेत शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेत गट अ ब क असे तीन गटात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अ गटातून सौम्या कमठाणे ही प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत लखन बोंबले द्वितीय क्रमांक तर प्रांजल गायकवाड व श्रुतिका येनावार यानी तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी शिवम मठवाले व वृशांक पाटील या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच ब गटातून वैभव शिरगिरे प्रथम तर आयुष बुडावार द्वितीय वेदांत पाठक तृतीय तर शरण्या माटलवार, ईशान चव्हाण, दुर्गा आगळे उत्तेजनार्थ तर क गटातून पूजा ठोमसे प्रथम प्रियांका ठाकूर द्वितीय श्रुती जक्कावार तृतीय अनुष्का कोंडावार आरती रोंटे उत्तेजनार्थ असं या विध्यार्थीना गोल्ड, सिल्वर, ब्रॉन्ज मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी संस्कार कथा, नीतिकथा साने गुरुजींच्या कथा सांगितल्या होत्या. या स्पर्धेला परीक्षक म्हणून मराठी विभाग प्रमुख कासलोड, दत्ता हमंद, अनिता येनावार यांनी काम पाहिले. या स्पर्धेतील उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षकांचा ही गुणगौरव करण्यात आला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी शाळेच्या संचालिकारमा ठक्कुरवार या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच शाळेचे प्रिंसिपल जाधव व्हाय प्रिंसिपल एम सपना आदी मान्यवर उपस्थित होते. तर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार व तसेच सचिव यशवंत संगमवार यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करून सर्व शिक्षक व विध्यार्थीचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन भास्कर यांनी केले.